आजच्या सामाजिक व्यवस्थेवर ताशेरे ओढणारी सत्यदर्शी कादंबरी 'कीड '

कवी, कथाकार आणि आता सशक्त कादंबरीकार म्हणून मराठी वांड्मयविश्वात ज्यांनी आपल्या 'कीड' यां समर्थ कादंबरीसह पाऊल टाकलं ते विशाल मोहोड आता साहित्य क्षेत्रातील सर्वपरिचित नाव होय. खरं तर त्यांचा 'कुचंबणा' हा कथासंग्रह प्रचंड गाजला व अत्यंत प्रतिष्ठेचे पुरस्कार यां कथासंग्रहाला प्राप्त झाले.

अत्यंत संवेदनशील मन व वर्तमान तटस्थपणे टिपण्याची लेखकांची वृत्ती ही त्यांच्या साहित्य-फलश्रुतीची खरी वैशिष्ट्ये आहेत. 'कीड ' यां कादंबरीचा पायाही हाच आहे. वाट्याला आलेलं वास्तव अन् संघर्ष अत्यंत निर्भयपणे कोणताही संकोच न ठेवता लेखक 'कीड' मधून मांडतात.आज यां परिस्थितीच्या वेढ्यात नवीन पिढी सापडली आहे. यां पिढीच्या मानसिक भावनिक वेदनाची मोकळी चर्चा ही कादंबरी करते. म्हणूनचं समाजव्यवस्थेला लागलेली कीड बेरोजगार तरुणांच्या जीवाशी कशी खेळते. व अत्यंत प्रफुल्लित, उत्साही तारुण्याला कशी कोमेजून टाकते यांचा जिज्ञासावर्धक वेध ही कादंबरी घेते. एकदा हाती घेतल्यावर ही कादंबरी हातची सोडवत नाही. ती यासाठी की, जातीय दंगली, कर्फ्यू, जाळपोळ, पदभरती, भ्रष्टाचार, निराशा, बेगडी राजकारण, खोटी आश्वासन यां साऱ्या वादळात उध्वस्त होणारी तरुणाई वाचकाला अश्वस्त करते. प्रत्येक वाचकाला ही कादंबरी आपली वाटते. कारण यात आलेली पात्र वाचकांच्याही अवतीभवती असतातचं. त्यामुळे वाचकांच्या अंतःकरनाचा ठाव घेणारी, कधी खळखळून हसवणारी, तर कधी रडायला भाग पाडणारी, ही कादंबरी सध्यापरिस्थितीचे विविधांगी नकली मुखवटे आपल्या समोर उघडे करते.

कादंबरीचा मुख्य नायक दीपक अत्यंत चिंतनशील व संवेदनशील, मनोवृत्तीचा सात्विक स्वभावाचा तरुण आहे. हा तो उघड्या डोळ्यांनी विकृत व विध्वसंक आणि स्वार्थी जगाचा अनुभव घेतो. अत्यंत अवघड परिस्थितीत शिक्षण घेऊन पदवी प्राप्त करुनही नोकरीची आशा सारखी मंदावत जाते. यां काळात कुटुंब, मित्र, आप्त,राजकारणी, संस्थाचालक, व एकूण व्यवस्था यां नायकाच्या व्यक्तिमत्वाला, कमालीचे हादरे देते. बी एड. ची पदवी घेतलेली एक अख्खी दहा बारा मित्रांची झुंड कशी वारंवार हतबल होते. अन त्यातही हळव्या मनाचा नायक कसा क्षणोक्षणी पराभूत होतो. याची अत्यंत मार्मिक मांडणी लेखक विशाल मोहोड यांनी केली आहे. शिकल्यानंतर ही सर्व भ्रष्ट यंत्रणा नायकाला डोळसपने वाचता येते त्यामुळे होणारा त्रागा मेंदूमध्ये झीणझिण्या आणतो. वैतागून नायक म्हणतो शिकल्यामुळे खरे-खोटे, योग्य अयोग्य समजू लागले. आता असं वाटते शिकलो ही चूक झाली अडाणीच बरा होतो. नायकाचे हे मनोगत अत्यंत पिळवटून टाकते. नव्या जोमाने शिक्षण घेऊन पुढे येणाऱ्या नवीन पिढीला पंगू करण्याचे प्रसंग कादंबरीत ठिकठिकाणी पेरल्याने ही कादंबरी वास्तवाच्या अधिक जवळ जाणारी व सुशिक्षित बेरोजगाराच्या विभ्रमाव्यवस्थेचे चित्रण करणारी जिवंत कादंबरी ठरते. खरंतर यां कादंबरीचा नायक एक सुस्पष्ट विचारसरणीचा अभ्यासू बाण्याचा व जीवनाकडे अत्यंत प्रामाणिकपणे पाहणारा साधा सरळ व्यक्तिमत्वाचा आहे. पण अवतीभवतीचा प्रचंड कोलाहल सहन करताना त्याची कमालीची दमछाक होते. अवहेलना, उपेक्षा, अपमान,आणि निराशा यां पातळ्यावर हा नायक कायम संघर्षरत असतो. चीड, त्रागा, अगतिकता, यांचा सामना करणारा हा नायक म्हणून कादंबरीच्या अंतापर्यंत वाचकाला अस्वस्थ करतो. लेखकाने नायकाच्या मनातील द्वंद इतके गहन चितारले आहे की कधी कधी लेखकच तर नायक नसेल असा आभास क्षणभर होऊन जातो इतकी तीव्रता नायकाच्या व्यक्तिमत्वात आलेली आहे.

आंदोलनातील मोर्च्यामधील जोश, निवडणूक काळातील खोटी आश्वासनं,योजनामधील टक्केवारी, मराठा आरक्षणाचा तितंबा, कौटुंबिक कलह, न कमावत्या मुलाबाबतची कुटुंबाची मानसिकता,मनाचे दुखरे कोपरे स्त्री बेरोजगारीमुळे सोसावी लागणारी टवाळकी, अवमान, तारुण्यसुलभ भावनांची शारीरिक मानसिक अभिव्यक्ती,पुरेशे शिक्षण घेऊनही रिकामे हात, व त्यामुळे मनाची घुसमट, पवित्र पोर्टलची दैना, कधी कधी वाट्याला आलेली सहानुभूती, शिक्षण क्षेत्रातील दलाली, तासिका तत्वावर काम करणाऱ्यांची दैनावस्था, शोषक संस्थाचालक, शेतकऱ्यांचे न संपणारे प्रश्न नैराश्यातून झालेल्या आत्महत्या, स्पर्धापरीक्षेचे खूळ, एकतर्फी प्रकरणातून घात, बेरोजगारीमुळे वैवाहिक जीवनाबाबतच्या तडजोडी, आणि एकूणच आयुष्याच्या टप्प्यावर नवा चेहरा घेऊन उभी राहिलेली वैफल्यता कादंबरीभर विखुरलेली आहे.त्यामुळे एकही वाक्य वगळून वाचक पुढे जाऊ शकत नाही.वाचकाला अत्यंत सीताफीने काठावस्तुंशी एकरूप करण्याचं कौशल्य लेखकांला गवसलेलं आहे.विशेष म्हणजे भाषेचा सौष्टव गोडवा, म्हणी, वाक्प्रचार, सुभाषित शिव्या यातून प्रत्येक पात्राची हुबेहूब प्रतिमा लेखक वाचकसमोर उभी करतात. कमालीची जिवंत व्यक्तीचीत्रण ही यां कादंबरीची अत्यंत उजवी बाजू होय.

सुशिक्षित बेरोजगारांच्या आयुष्याचा लेखाजोखा मांडताना लेखक सहजच अतिशय गंभीर व जीवनदायी उपदेशही मधूनमधून करतात त्यामुळे वाचकांची वृत्ती आपसूकच समृद्ध होतं जाते. जिज्ञासा, उत्कंठा, आणि जीवननिष्ठा यां तीन्ही पातळीवर ही कादंबरी यशस्वी ठरली असून अत्यंत सकारात्मक शेवट ही यां कादंबरीची महत्वाची बाजू होय. हाती आलेली नोकरीची ऑर्डर जशी नायकाच्या मुखावर प्रसन्नता व डोळ्यात आशेची किरण लखलखीत करते. त्याचप्रमाणे हृदयाला कमालीचे समाधानही बहाल करते.

सध्यास्थितीला कादंबरी सारख्या मोठया आवाक्याच्या वाड्मय प्रकारातून लेखकाने अलगद पकडले आहे.त्यामुळे वास्तवाचा वेध घेणारी ही कादंबरी इतिहासात तत्कालीन वर्तमानाचा वेध घेणारी महत्वाची कादंबरी म्हणून लौकिकप्राप्त ठरेलं याची मला खात्री आहे.

● प्राचार्य डॉ.शोभा ई.रोकडे
'सांजभूल' , सोनल कॉलनी, शेगाव रोड
अमरावती , मो. ९९६०९३७७६९

सकारात्मकता पेक्षा स्वीकारता आवश्यक : डॉ. नंदू मुलमुले
मानस प्रबोधिनी आयोजित मन सुद्ध तुझ! संवाद सत्र

अमरावती दि. १४ : दिनांक १० ऑक्टोबर जागतिक मानसिक आरोग्य दिवस या निमित्याने सध्या गाजत असलेली ए बी पी माझा वाहिनी वरील मन सुद्ध तुझ - सिजन-२ या मालिकेतील एका भागावर अमरावतीकरां सोबत संवाद साधला तो स्वतः मालिकेचे लेखक ख्यातनाम मनोविकार तज्ञ, लेखक डॉ नंदू मुलमुले यांनी .गप्पा मध्ये स्वतःच्या आडनांवाचा प्रवास ते त्या तरुणाईच्या सौंदर्य या संकल्पना आणि एनोरेक्सिया सारख्या आहार संबध असणाऱ्या मनोसमस्या विषयी तुडुंब भरलेल्या सभागृहात हास्य, मिश्किल पणा आणि अभ्यासपूर्ण मांडणी ने विषय उलगडल्या गेला.

अमरावती मधिल मानसशास्त्र विषयक रुची असणाऱ्या समविचारी मंडळींचा गट मानस प्रबोधिनी आणि विविध सामाजिक शैक्षणिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक ०३ - १० ऑक्टोबर २०२४ या काळात मानसिक आरोग्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते .

या अनुषंगाने अभ्यासवर्ग, कार्यशाळा, भिंती पत्रक प्रदर्शन , पथनाट्य सादरीकरण,संवाद सत्र आयोजित करण्यात आले होते

दिनांक १० ऑक्टोबर २०२४, शुक्रवार ला सकाळी ११ वाजता

विद्याभारती महाविद्यालयातील फार्मसी विभागाच्या सभागृहात मा. कुलगुरू डॉ मिलिंद बारहाते यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये, विद्याभारती संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ मिथिलेश मोरया यांच्या उपस्थिती मध्ये आणि प्राचार्या डॉ येनकर यांच्या अध्यक्षतेखाली मन सुद्ध तुझ ! या उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.

या वेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मा कुलगुरू डॉ मिलिंद बारहाते यांनी .सध्याच्या काळात मानसिक आरोग्य आणि त्या बाबतची जाणिव निर्माण करणे ही जवाबदारी आपल्या प्राध्यानक्रमात असावी व ही जाणिव सातत्याने स्वतःच्या आचरणात असणे खूप गरजेचे आहे. अशा शब्दात मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमांतर्गत या मालिकेचा भाग दाखविण्यात आला आणि त्या अनुषंगाने किशोरवयीन- तरुण मुला मुलींच्या सौंदर्य विषयक स्व कल्पना आणि स्व प्रतिमा या विषयी सोबतच मैत्री ,नातं ,आकर्षण या विषयी चे मनो विश्व उलगडण्याचा प्रयत्न डॉ नंदकुमार मुलमुले यांनी केला शिवाय या वेळी प्रश्नोतर च्या माध्यमातून पण संवाद साधल्या गेला प्रकट मुलखात स्वरूपात हा संवाद रंगला.

मानस प्रबोधिनी तर्फे डॉ श्रीकांत देशमुख यांनी मान्यवर मंडळींना सहभागी मंडळीनी रेखाटलेले चित्र स्मृती भेट म्हणून दिले. कार्यक्रमाच्या सुरवातीला विद्यार्थी मंडळीनी पथनाट्य सादर केले.

सूत्र संचालन डॉ शंकर वाकोडे यांच राहिले असून अध्यक्षीय मनोगत प्रा डॉ येनकर यांनी व्यक्त केले, आभार प्रदर्शन डॉ रामटेके यांनी मांडले.

सदर उपक्रमात सह आयोजक या नात्याने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, शासकीय ज्ञान विज्ञान संस्था अमरावती, शिवाई एज्युकेशन व मेडिकल ट्रस्ट, महात्मा फुले महाविद्यालय अमरावती, इंदिराबाई मेघे महा विद्यालय, विद्याभारती महाविद्यालय, डॉ पंजाबराव देशमुख नर्सिंग कॉलेज या संस्था जुळल्या होत्या.

सदर कार्यक्रमात अमरावती येथील मान्यवर मंडळी डॉ रोहित देशमुख, डॉ उषा देशमुख डॉ बी डी बेलसरे,प्रा सौ बेलसरे, डॉ अजय डफले डॉ सौ डफले डॉ मोहना कुळकर्णी श्रीमती अनिता कुळकर्णी प्रा जपे श्री हेमंत खडसे, श्री सुनील यावलीकर,श्री प्रदीप पाटील , श्री राजाभाऊ शिराळेकर श्री सुधीर जगताप श्री संजय शेळकेश्री प्रदिप देशपांडे डॉविक्रम वानखेडे डॉ सावजी, प्रा डॉ नेहा हिरुरकर अशी बरीच मंडळी उपस्थित होती. मानस प्रबोधिनी तर्फे डॉ श्रीकांत देशमुख मनो विकार तज्ञ यांनी सदर कार्यक्रमास उपस्थित राहिल्या बद्दल आणि प्रत्यक्ष अ प्रत्यक्ष सहकार्य लाभलेल्या सर्व मंडळींचे आभार व्यक्त केले.

परतीच्या पावसाने पुन्हा दिला पूरधक्का

बुलढाणा दि. १४ : परतीच्या पावसाने गेल्या तीन दिवसांपासून थैमान घातले आहे. दसऱ्याच्या पूर्वसंध्येला अतिवृष्टीने तसेच नळगंगा धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याने मोताळा व मलकापूर तालुक्यातील नदीकाठच्या गावांना मोठा फटका बसला. दाताळा व मलकापूर शहरातील वस्त्यांमध्ये पाणी शिरल्याने २१६५ घरे बाधित झाली. १३ ऑक्टोबरच्या रात्री पावसाने पुन्हा तडाखा दिला. अतिवृष्टीने शनिवारसारखीच परिस्थिती उद्भवली. मलकापूर, मोताळा तालुक्यातील नदीकाठची गावे आणि वस्त्या पाण्याखाली गेल्या. सर्व काही वाहून गेल्याने दाताळ्यातील शेकडो कुटुंबे उघड्यावर आली.

जिल्ह्यातील नऊ तालुक्यांमध्ये ५७१ गावांत अतिवृष्टीने १ लाख ४७ हजार १५ हेक्टर क्षेत्रावरील पिके भूईसपाट झाली. यामुळे १ लाख २९ हजार ५११ शेतकऱ्यांचे हिरवे स्वप्न करपले. मलकापूर तालुक्यात ६५ हेक्टर क्षेत्रावरील शेतजमीन पिकांसह खरडून गेली. आस्मानी माऱ्याने या

कास्तकारांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. मका, पऱ्हाटी, सोयाबीन, तूर, केळी, पानवेल, शेवगा, झेंडू, भाजीपाला पिकांच्या नुकसानीचा प्राथमिक अहवाल शासनाला पाठविण्यात आला आहे.

मलकापूर तालुक्यातील दाताळा येथील नळगंगा नदीकाठच्या ५९० घरांवरून पुराचे पाणी वाहिले. ५५ घरांची पूर्णतः पडझड झाली. ५३५ घरे अंशतः बाधित झाली. त्याचप्रमाणे मलकापूर शहरातील नदीकाठच्या १५७५ घरांना पुराचा फटका बसला. १० घरे जमीनदोस्त झाली. तसेच १५६५ घरे अंशतः बाधित झाली. १३ ऑक्टोबरला नळगंगा नदीने रौद्ररूप धारण केले होते. सालीपुरा, काशीपुरा, वल्लीचौक, भालेगाव रोड या भागातील पुलांवरून पुराच्या पाण्याचा प्रवाह रात्रीपासून सुरू होता. बोदवड रोडपर्यंत पाणी आाले होते. मलकापूर ते बुलढाणा हा महामार्गही दूरवरून पाणी वाहत आल्याने पाण्याखाली गेला होता. दोन ते तीन फूट पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने रोडही दिसत नव्हता.

जिल्ह्यातील नऊ तालुक्यांमध्ये मोठी हानी झाली. ५७७ गावांमधील १ लाख २९ हजार ५११ शेतकऱ्यांचे १ लाख ४७ हजार ८० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. यामध्ये बुलढाणा तालुक्यातील ४८ गावांमधील २७३५ शेतकऱ्यांचे ८२५ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. चिखली तालुक्यात ५ गावे, ३३४८ शेतकरी आणि २ हजार ६०० हेक्टर क्षेत्र बाधित झाले. मोताळा तालुक्यामध्ये ११६ गावांमधील २१ हजार १८२ शेतकऱ्यांचे १८ हजार २४० हेक्टरवर नुकसान झाले. मलकापूर तालुक्यात ७८ गावांना फटका बसला. १२ हजार ५७० शेतकऱ्यांचे २४ हजार ९६६ हेक्टर, खामगाव : १८ गावे ३८९ शेतकरी, २६८ हेक्टर, नांदुरा : ९२ गावे, २४ हजार शेतकरी, ३१ हजार ५१३ हेक्टर, जळगाव जामोद : ११० गावे, ३२ हजार ६८ शेतकरी, ३० हजार ८१३ हेक्टर, संग्रामपूर : १०६ गावे, ३२ हजार ९८० शेतकरी ३७ हजार ३०७ हेक्टर व सिंदखेड राजा तालुक्यात ४ गावांमधील १ हजार २४९ शेतकऱ्यांची ४९८ हेक्टर क्षेत्रावरील पिकांची हानी झाली.

परतवाडा येथील जोशी कुटुंबाने हस्तांतरीत केलेल्या गौरी महालक्ष्मीची स्थापना अमरावती येथील सावता कॉलनीत मेटकर यांच्या घरी

मूळचे परतवाडा येथील राहणारे जोशी कुटुंब व त्यांच्या शेजारी राहणारे मेटकर कुटुंब या दोन्ही कुटुंबातल्या रुणानुबंधाच्या गाठी इतक्या मजबूत झाल्या की ज्या जोशी कुटुंबाने शंभर वर्षांपासून अखंडपणे गौरी महालक्ष्मीची आस्थेने दरवर्षी स्थापना करून पुजा अर्चेसह भक्तांना दुर्मिळ दर्शनाचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध करून देत होते.परंतू कालांतराने जोशी कुटुंबात जेव्हा एकुलत्या एक वृद्ध म्हाताऱ्या आजी राहील्या तेव्हा थकलेल्या वयोवृद्ध जोशी आजींनी त्यांच्या कडच्या परंपरागत चालत आलेल्या गौरी महालक्ष्मीचे हस्तांतरण मेटकर कुटुंबाकडे म्हणजे विश्वास मेटकर यांच्या आईला प्रामुख्याने अखंडपणे दरवर्षी नवरात्रीत गौरी महालक्ष्मींची स्थापना व पूजाअर्चा करण्याचा आग्रह केला.मनातून आस्था आणि अंत:करणातुन श्रध्दा असलेले मेटकर कुटुंब प्रमुख तथा व्यवसायाने अभियंता असलेले माझे मित्र विश्वास मेटकर यांच्या आईसह संपूर्ण मेटकर कुटुंबाच्या सदस्यांनी ते सर्व सोपस्कार व्यवस्थीत सांभाळण्याचे आश्वासन मनस्वी आनंदाने स्विकारले.दरवर्षी नवरात्रीत गौरी महालक्ष्मीची स्थापना करून या वर्षी सुद्धा मोठ्या प्रमाणात असंख्य माय माउलींच्या उपस्थितीत श्रद्धेच्या आस्थेने पुजा अर्चा पार पाडली.मुळच्या पश्रोट येथील सौ.विजया सूरेंद्र कडू यांचे बंधू विश्वास मेटकर

यांची कन्या सोनल महल्ले यांनी ईटीव्ही भारत शी बोलतांना गौरी महालक्ष्मीची स्थापना व पूजन कसे काय त्यासाठी हा संपूर्ण इतिहास सांगितला.तसेही गौरी महालक्ष्मीची स्थापना व त्यातले नाजूक नाते जपण्यासाठी तसेच लोक संस्कृती समाजाच्या घराघरात कालानुरूप पोहोचली ती या साठीच की जीवनात माणसाचं नातं हे साथ देणारं असावं .ते ब्राह्मण आम्ही पाटील असे जाती पातीचं स्वार्थ पाहणारं नसावं.मन सुखावणारं असावं मन दुखावणार नसावं .बदल घडवणार असावं बदला घेणारं नसावं.तसेच समज देणारं असावं गैरसमज वाढवणारं नसावं.कौतूकास्पद असावं पण संशयास्पद नसावं.आयुष्याची डायरी लिहणारा तर तो देव असतो.पण वाचणारे आपण असतो.जीवनात खुप काही हवं असत.पण पाहिजे तेच भेटत नसतं म्हणून सर्व काही नशीबात असत.पण आपल नशीब केवळ हाताच्या रेषेत नसतं तर ते घडवण हे आपल्याच कर्माच्या हातात असत.हे सर्व रहस्य गौरी महालक्ष्मीची स्थापना व तीचे आस्थेने पूजन करण्यात दडले आहे हे विसरू नका आणि हेही लक्षात ठेवा की गौरी महालक्ष्मीची महती सांगण्यायेवढे माझे कडे सामर्थ्य नसले तरी जे आहे ते मी माझ्या तूटक्या शब्दात तुम्हाला आज अगदी थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करतो तो म्हणजे ज्ञान अर्थात तुम्ही काय करु शकता याचे भान असणे आणि शहाणपण म्हणजे कधी काय करु नये याचे भान असणे.परिस्थितीच्या फुग्यात कष्टाची हवा भरुन आयुष्य जगणं गरिबीलाच जमतं.निखळ हास्याला श्रीमंतीची नव्हे तर समाधानाची गरज असते ते हास्य तुम्ही आनंदाने कशात शोधता यावर अवलंबून आहे.जो आनंद जोशी कुटुंबाने मेटकर कुटुंबाला हस्तांतरीत केलेल्या गौरी महालक्ष्मीची स्थापना करुन दरवर्षी मिळतो व सतत मिळत राहील बस येवढेच.

वन्यजीव संरक्षणामध्ये डिजिटल इनोवेशन एक्सप्लोर करे या विषयावर
वन्यजीव सप्तानिमित्त विनायक विद्यामंदिर येथे विविध उपक्रम संपन्न

अमरावती दि. १४ : विनायक विद्यामंदिर येथे प्रणितशास्त्र विभागातर्फे वन्यजीव सप्ताह २०२४ निमित्त २ ऑक्टोबर ते ०८ ऑक्टोबर वन्य जीव संरक्षणामध्ये डिजिटल इनोवेशन एक्सप्लोर करणे या विषयावर विविध उपक्रम रम राबविण्यात आले .३ ऑक्टोंबर रोजी रांगोळी स्पर्धा पोस्टर्स स्पर्धा फोटोग्राफी स्पर्धा आयोजित करण्यात आले यात विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला ३ ऑक्टोंबर रोजी रांगोळी स्पर्धा पोस्टर्स स्पर्धा फोटोग्राफी स्पर्धा आयोजित करण्यात आले यात विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला रांगोळी स्पर्धेत कुमारी खुशबू यादव बीएससी भाग दोन या विद्यार्थी ३ ऑक्टोंबर रोजी रांगोळी स्पर्धा पोस्टर्स स्पर्धा फोटोग्राफी स्पर्धा आयोजित करण्यात आले यात विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला रांगोळी स्पर्धेत कुमारी खुशबू यादव बीएससी भाग दोन या विद्यार्थी ३ ऑक्टोंबर रोजी रांगोळी स्पर्धा पोस्टर्स

स्पर्धा फोटोग्राफी स्पर्धा आयोजित करण्यात आले यात विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला रांगोळी स्पर्धेत कुमारी खुशबू यादव बीएससी भाग दोन या विद्यार्थीने प्रथम क्रमांक प्रत कोल्हापूर स्पर्धेत प्रथम क्रमांक तनुश्री सूर्यवंशी बीकॉम भाग ३ व द्वितीय क्रमांक दर्शन मंगरूळकर यांनी पटकावला फोटोग्राफीमध्ये प्रथम क्रमांक खुशबू यादव या विद्यार्थी ने पटकावला या स्पर्धेला परीक्षक या स्पर्धेला परीक्षा डॉ प्रतिभा महाले असिस्टंट प्रोफेसर नांदगाव खंडेश्वर या लाभल्या होत्या दि ४ ऑक्टोबरला जंगलवाचन या विषयावर शिपफुल्ल सावरकर एज्युकेशन ऑफिसर ताडोबा अंधारी टायगर रिझर्व्हियर यांनी विद्यार्थ्यांना अतिशय उत्कृष्ट व म्हणून रंजनात्मक मार्गदर्शन न वेबिनारद्वारे केले दि ५ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र शासन सामाजिक वनीकरण विभाग अमरावती निसर्ग शिक्षण व वनविज्ञान केंद्र मासोद येथे विद्यार्थ्यांनी भेट देऊन तेथील बारकाव्या दि ५ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र शासन सामाजिक वनीकरण विभाग अमरावती निसर्ग शिक्षण व वनविज्ञान केंद्र मासोद येथे विद्यार्थ्यांनी भेट देऊन तेथील बारकाव्याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला दिन ७ ऑक्टोबर रोजी कृषी विज्ञान केंद्र दुर्गापुर बडनेरा येथे विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली या क्षेत्रभेटी अंतर्गत कुक्कुटपालन पशुसंवर्धन गांडूळ खत याबद्दल माहिती डॉ दिन ७ ऑक्टोबर रोजी कृषी विज्ञान केंद्र दुर्गापुर बडनेरा येथे विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली या क्षेत्रभेटी अंतर्गत कुक्कुटपालन पशुसंवर्धन गांडूळ खत याबद्दल माहिती महेश आखूड सब्जेक्ट मॅटर,वेटरनिटी स्पेशालिस्ट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे आयोजन प्राणशास्त्र विभागाच्या प्रा. शितल काळे यांनी वन्यजीव सप्ताहाचे अवचित्य साधून केले प्राचार्य डॉ.पद्माकर टाले सर,संस्थेचे सचिव मा श्री यश घोडके व मा .सौ .डिंपल खोडके यांनी स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले .

शाविज्ञावी संस्था अमरावती व वेक्स यांच्या संयुक्त विद्यमाने टॉक विथ ट्री कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन

अमरावती दि. १४ : जरी पुस्तके आणि ऑनलाइन संसाधने झाडे ओळखण्यासाठी उपयुक्त साधने आहेत, तरीही झाडांबद्दल जाणून घेण्याचा सर्वोत्तम आणि सर्वात संस्मरणीय मार्ग म्हणजे त्यांना जवळून आणि वैयक्तिकरित्या पाहणे. ट्री वॉक केल्याने केवळ झाडेच दिसत नाहीत तर स्पर्श आणि वासाद्वारे त्यांच्या सर्व आयामांशी परिचित होऊ शकते म्हणून वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्रोफेसर डॉ मंजुषा वाठ यांच्या संकल्पनेतून टॉक विथ ट्री या या कार्यक्रमाचे गत तीन वर्षापासून आयोजन करण्यात येते आहे हा कार्यक्रम एक आनंददायी ,माहितीपूर्ण आणि आकर्षक असा उपक्रम आहे. दरवर्षी हा कार्यक्रम वनराईने नटलेल्या शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था या परिसरात आयोजित केला जातो यंदा मात्र अमरावतीतील दुसरा हिरवा परिसर,बांबू गार्डन येथे याचे आयोजन करण्यात आले. डॉ मंजुषा वाठ, डॉ मोहनीश बोखड व अक्षय ओंकार या तज्ञ मार्गदर्शकांनी या कार्यक्रमास मार्गदर्शन केले.संपूर्ण फेरफटक्या दरम्यान तज्ञ मार्गदर्शकानी झाडांचे सौंदर्य आणि त्याच्या सभोवतालची परिसंस्था कल्पकतेने स्पष्ट केली. अक्षय ओंकार यानी सहवासातील कीटक, फुलपाखरे ,पक्षी आणि मधमाश्या यांच्याशी झाडांच्या गुंतागुंतीच्या नातेसंबंधांबद्दल, तर डॉक्टर मोनीश बोखड यांच्या यांनी वृक्षांच्या विविध प्रजातींबद्दल तर डॉ मंजुषा वाठ यांनी रानफुलांबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमानंतर मार्गदर्शकांच्या आकर्षक कथनाने अद्वितीय आणि आकर्षक अंतर्दृष्टी प्रदान केली असे प्रतिपादन उपस्थित अनेकांनी व्यक्त केला. मार्गदर्शकांनी झाडांच्या सौंदर्याची प्रशंसा केली तसेच निरीक्षण करण्यास आणि सभोवतालच्या नैसर्गिक जगाशी अधिक सखोलपणे जोडण्यासाठी प्रोत्साहित केले. एकंदरीतच, वॉकविथ ट्री ही सर्वांसाठी समृद्ध करणारी संधी होती आणि निसर्गाबद्दल निसर्गातील मोठ मोठ्या वृक्षांबद्दल त्याच्या सर्व भव्यतेबद्दल नवीन विस्मय होता. , निसर्गात मग्न होण्याची सामायिक वातावरणाची खूप गरज असते. आजचा कार्यक्रम ही एक मौल्यवान संधी आहे असे मत अनेकानी व्यक्त केले . आम्हीभविष्यात पुन्हा अशा अनुभवांमध्ये उत्सुकतेने भाग घेऊ अशा प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केल्या.

वनस्पतीशास्त्र मंडळ शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था व वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमास संस्थेचे डॉ वर्षा वर्षा हुतके डॉ कीरण जाधव, डॉ स्वप्निल महामुने वेक्स चे सचिव डॉ जयंत वडतकर, आदी उपस्थित होते. संस्थेचे संचालक डॉ सतीश माळोदे यांनी या उपक्रम असाच दरवर्षी पुढे सुरू ठेवावा करिता शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रीय जनजाती आयोगातर्फे विविध ठिकाणी भेटी

अमरावती, दि. १४ : राष्ट्रीय जनजातीय आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य व आयोगाचे सदस्यांनी दि. ७ व ८ ऑक्टोबर या दोन दिवशी जिल्ह्यातील मोर्शी आणि अमरावती येथे भेटी देऊन आदिवासी समाजाच्या समस्या जाणून घेत प्रत्यक्ष भेटी दिली.

आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य आणि सदस्य राजीव सेक्सेना, वरिष्ठ अन्वेषक अंकित सेन, गोवर्धन मुंडे, अमृतलाल प्रजापती यांनी जिल्ह्याचा दौरा केला. यात जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीला अंतरसिंह आर्य उपस्थित होते. बैठकीत सर्व शासकीय विभागांचा आढावा घेण्यात आला. यावेळी वन विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करण्याबाबत निर्देश दिले. तसेच अद्यापही पक्के रस्ते नसलेल्या गावामध्ये तातडीने रस्ते मंजूर करण्याचे निर्देश बांधकाम विभागाला देण्यात आले. सिकलसेल निमिया आजाराची तपासणी करून आवश्यक उपायोजना करण्याच्या सूचना आरोग्य विभागाला केल्या. अनुसूचित जमातीच्या नागरिकांना गावामध्ये मुलभूत सोईसुविधा पोहचतील या अनुषंगाने आवश्यक उपायोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच ट्रॅसिटी प्रकरणी तात्काळ आवश्यक कार्यवाही करण्याबाबत पोलिस विभागालस सूचना देण्यात आल्या.

मत्स्यव्यवसाय विभागात डाटा एन्ट्री ऑपरेटर पदाची तात्पुरत्या स्वरूपात भरती

अमरावती, दि. १४ : सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) कार्यालयातील एका 'डाटा एन्ट्री ऑपरेटर' या पदाची कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यासाठी नेमणूक करण्यात येणार आहे. यासाठी आवेदन अर्ज मागविण्यात आले आहे. सदर पदासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत शुक्रवार, दि. २२ ऑक्टोबर २०२४ आहे. जाहिरात आणि आवेदन अर्जाचा नमुना सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां.) श्री. पुंडकर यांची इमारत, पहिला माळा, अतुल मंगल कार्यालय जवळ, रूख्मिणीनगर, अमरावती येथे सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. याबाबत अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी क्रमांक ९४०४२३७१२८ वर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्त एम. एम. मेश्राम यांनी केले आहे.

अमरावती येथे २२ ते २५ ऑक्टोबरपर्यंत पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी (महिला) क्रीडा स्पर्धा
शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त आयोजन

अमरावती दि. १४ : शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,अमरावतीच्या संयुक्त विद्यमाने दि.२२ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर२०२४ पर्यंत पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कब्बडी (महिला) क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेत महाराष्ट्र, राजस्थान,गुजरात, मध्यप्रदेश राज्यातील ७४ विद्यापीठाच्या चमू सहभागी होणार आहेत.